जा. क्र. प्रा./प्रा. शि/जा. तु./पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय.
दिनांक १३/१२/९४

प्रति,

मुख्याध्यापक/ मुख्याध्यापिका,

गुरुकुल प्राथमिक शाळा
लोणावळा

विषय : – सन १९९४–९५ या व त्यापुढील शैक्षणिक वर्षासाठी अनुदानित प्राथमिक शाळांतील शिक्षक संख्या व इयत्तानिहाय तुकडया मान्यता...

वरील विषयासंदर्भात कळविण्यात येते की, आपल्या शाळेची सन १९९४–९५ या शैक्षणिक वर्षातील दिनांक ३० सप्टेंबर १९९४ ची इयत्ता निहाय विद्यार्थी पटसंख्या व उपस्थिती आणि प्रशासन अधिकारी/शिक्षण अधिकारी यांनी मंजूर केलेल्या शिक्षक पदांची संख्या या दोन बाबी विचारात घेऊन आपल्या शाळेस सन १९९४–९५ या शैक्षणिक वर्षासाठी अनुदान तत्वावर खालील प्रमाणे इयत्तानिहाय तुकडयांना मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार इयत्तानिहाय व तुकडीनिहाय अध्यापन कार्य होणे आवश्यक आहे. शाळेत मान्य तुकडयापेक्षा कमी संख्येने तुकडया आढळून आल्यास कमी असणाऱ्या तुकडयाच्या संख्येइतक्या शिक्षकांची मान्यता काढून घेतली जाईल.

| इयत्ता | विद्यार्थी पटसंख्या | उपस्थिती | मंजूर तुकडयांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ ली | ८० | ७३ | ०१ | |
| २ री | ७९ | ७५ | ०१ | |
| ३ री | ७७ | ७३ | ०१ | |
| ४ थी | ७५ | ७३ | ०१ | |
| ५ वी | | | | |
| ६ वी | निरंक | | | |
| ७ वी | | | | |
| एकूण | ३११ | २९४ | ०४ | |

..२/..

वरील प्रमाणे इयत्ता निहाय विद्यार्थी पटसंख्या/उपस्थिती व . . . तुकडयांची संख्या यानुसार आपल्या शाळेस सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षासाठी खालीलप्रमाणे शिक्षक पदांना मान्यता देण्यात येत आहे.

| अ. नं. | पदाचे नांव | मंजूर संख्या |
|---|---|---|
| १. | वरिष्ठ मुख्याध्यापक - | ०१ |
| २. | सहा. शिक्षक - | ०४ |
| ३. | पदवीधर शिक्षक - | — |
| | एकूण मान्य शिक्षक संख्या - | ०५ |

मुख्याध्यापकास प्रत्येक आठवडयास किमान १२ तासिकांचे प्रत्यक्ष अध्यापन व १२ तासिकांचे पाठनिरीक्षण अनिवार्य राहील.

आपल्या शाळेसाठी वर नमूद केल्याप्रमाणे सर्व वर्गाच्या मिळून एकूण ०४ (चार) तुकडया व ०५ (पाच) शिक्षक संख्या मंजूर केली असून यापुढे यावर्षी अगर त्यापुढील कोणत्याही वर्षी जादा तुकडी अगर जादा शिक्षकास मंजुरी दिली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. पुढील अगर त्यानंतरच्या एखाद्यावर्षी इ. २ री ते ७ वी पर्यंतच्या एखाद्या वर्गास नैसर्गिक वाढीमुळे जादा तुकडीची आवश्यकता भासत असेल तर इ. १ ली अगर अन्य वर्गाच्या मंजूर तुकडयातील तुकडी कमी करून शाळांतर्गत समायोजनाने संबंधित वर्गास तुकडी उपलब्ध करून देता येईल. त्याबाबतचा आवश्यक तसा प्रस्ताव शिक्षणाधिकारी [प्राथमिक]/ प्रशासन अधिकारी यांचेकडे सादर करून त्यास मान्यता घ्यावी.

१.५ कि.मी. अंतरात अन्य कोणतीही प्राथ. शाळा [जि.प. अगर खाजगी] नसेल तर मात्र पटसंख्या वाढीमुळे जादा तुकडी आवश्यक असेल तर प्रशासन अधिकारी/ शिक्षण अधिकारी [प्राथ] यांचेमार्फत मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करता येईल. तथापि पूर्व मंजूरीशिवाय कोणत्याही परिस्थितीत नवीन तुकडी सुरू करू नये अगर त्यावर शिक्षकाची नेमणूक करू नये. तसेच शाळेने आपल्या अधिकारात इ. १ ली च्या प्रत्येक तुकडीत ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत. शिक्षणाधिकारी[प्राथ] अगर प्रशासन अधिकारी यांचे पूर्व मंजूरीने ही संख्या ६० पर्यंत वाढविता येईल.

वरील सूचनांचे आपण काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा अनुदान कपात अगर शाळेची मान्यता काढून घेणे अशी कारवाई खात्याकडून केली जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - १.

...३/-

प्रत – ~~शिक्षण अधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद~~, ......../प्रशासनअधिकारी ~~म.न.पा.~~/न.पा.शि.मं. लोणावळा यांना देऊन त्यांना सूचना देण्यात येते की, सदर शाळा वरील प्रमाणे सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करेल या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी. यापुढील कोणत्याही वर्गाची पटसंख्या ६० पेक्षा अधिक होणार नाही याची दक्षता घेऊन प्रवेश नियंत्रित करावेत. तसेच वरील प्रमाणे एकूण मंजूर तुकड्यापेक्षा जादा तुकड्या सुरु केल्या जाणार नाहीत हे पहावे.

—— xxxx ——